आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ सप्टेंबर २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- एफडीएचे अधिकारी महाप्रसाद, भंडारा, इफ्तारी आणि लंगरची तपासणी करणार, सणासुदीच्या काळात पालन करायच्या उपाययोजनांचे कायमस्वरुपी आदेश जारी

- मुंबई ते सावंतवाडी रोड दरम्यान नवी नियमित रेल्वेगाडी सुरू

- महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांचं आश्वासन

**आणि**

- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये बंद

**<><><><><>**

सणासुदीच्या काळात पाळायच्या अन्न सुरक्षा उपाययोजनांसाठी कायमस्वरूपी, सर्वसमावेशक आदेश महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनानं आज जारी केला. याअंतर्गत विभागाचे अधिकारी अन्नछत्रं, महाप्रसाद, इफ्तारी, लंगर आणि भंडाऱ्यांच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करतील. सणासुदीच्या काळात खाद्यतेल, फळं, सुकामेवा, पनीर, खवा, मांस अशा खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते, आणि याच वेळी कमी दर्जाच्या किंवा भेसळयुक्त पदार्थांचा धोकाही वाढतो, तो टाळण्यासाठी हे आदेश दिल्याचं अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. यादृष्टीनं, उपवासाचे पदार्थ, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मांस, पाणी आणि बर्फ, खाद्यतेल, फळं, सुकामेवा, अन्नपदार्थ वाटप, बेकऱ्या, ई-कॉमर्स आणि आयात केलेलं अन्न या जास्त जोखमीच्या ११ खाद्यपदार्थांसाठी तपासणीसाठी स्वतंत्र प्रक्रिया ठरवून दिली आहे. याअंतर्गत सर्व धर्मांच्या सणांचं, राज्यव्यापी, प्रादेशिक आणि स्थानिक सण असं वर्गीकरण केलं असून अन्न सुरक्षेच्या दृष्टीनं ४ टप्प्यांची अंमलबजावणी यंत्रणा आखून दिली आहे. हे करताना कोणत्याही उपहारगृह चालकांना विनाकारण त्रास दिला जाणार नाही, असं आश्वासनही मुंढे यांनी दिलं.

**<><><><><>**

ध्वनी नियंत्रणाच्या नियमांच्या वाढत्या उल्लंघनामुळे सामान्य पुणेकर त्रस्त झाले आहेत. त्यामुळं गणेशोत्सवातला उत्साह कायम ठेवत ध्वनिमर्यादेचं काटेकोर पालन करायला हवं, अशी अपेक्षा पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केली. गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी ते संवाद साधत होते.

प्रेशर मिड आणि प्लाझ्मा ध्वनि यंत्रणा न लावण्याची मंडळांनी घेतलेली भूमिका स्वागतार्ह असल्याचंही ते म्हणाले. चार बेस आणि चार टॉप ध्वनि यंत्रणा वापरूनही डेसिबलची मर्यादा पाळता येऊ शकते. मात्र, मंडळांनी आवाजाची पातळी मोजून कोणत्याही परिस्थितीत ध्वनिमर्यादेचं उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, असं आवाहन त्यांनी केलं. लेजर लाईटवर पूर्णपणे बंदी असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

विसर्जन मिरवणूक वेळेआधी किंवा उशिरा संपण्यापेक्षा गर्दीचं नियंत्रण, कायदा-सुव्यवस्था आणि शांततापूर्ण वातावरण अधिक महत्त्वाचं असल्याचं आयुक्त कुमार यांनी सांगितलं. विसर्जन मिरवणुकीचे पास डिजिटल करण्यासह टिळक रस्ता आणि लक्ष्मी रस्त्यावरच्या मिरवणुकांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची सूचना त्यांनी केली. गणेश मंडळांनी अमली पदार्थविरोधी जनजागृती मोहीम राबवावी, असंही त्यांनी सुचवलं. दरम्यान, डीजेच्या वापराला विरोध करणारे विद्यानंद बापट यांना आज पुण्यात मारहाण झाली. याप्रकरणी एका गणेश मंडळाच्या माजी अध्यक्षाला अटक झाली आहे. या मारहाणीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी निषेध केला.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

सणासुदीच्या काळात नागपूर पोलिसांनी मोठ्या आवाजाच्या ध्वनियंत्रणा, बीम्स आणि लेजर लाइट्सवर बंदी घातली आहे. उद्या संध्याकाळी ४ पासून १ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत ही बंदी लागू राहील.

**<><><><><>**

मुंबई ते सावंतवाडी दरम्यान धावणाऱ्या नव्या एक्स्प्रेसला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर हिरवा झेंडा दाखवला. रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी ही गाडी CSMT हून निघून दुपारी सव्वा २ वाजता सावंतवाडी रोड ला पोहोचेल. सावंतवाडीहून संध्याकाळी ५ वाजून २० मिनिटांनी निघून ही गाडी सकाळी पावणे ७ वाजता CSMT पोहोचणार आहे. ही गाडी दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर,

खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, वळिवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ या ठिकाणी थांबा घेईल.

गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सोयीसाठी यंदा साडे-तीनशे विशेष गाड्या चालवल्या जातील, तसंच आवश्यकतेनुसार जादा गाड्यांची व्यवस्था केली जाईल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे यात सहभागी झाले होते. पश्चिम बंगालमधल्या डांकुनी पासून गुजरातमधल्या सुरतला जोडणाऱ्या पूर्व - पश्चिम कॉरिडॉरमुळं विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला मोठी मदत होईल, असं ते म्हणाले. मुंबईत सध्या लोकलच्या ३ हजार २०० फेऱ्या होत आहेत. त्यांची संख्या २०३० पर्यंत साडे ३ हजार होईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी त्यांनी राज्यातल्या रेल्वेच्या विविध पायाभूत सुविधांच्या कामांचीही माहिती दिली.

<><><><><>

यंदा मुंबई-गोवा महामार्गावरचे अजून काही उड्डाणपूल सुरू झाले आहेत. त्यामुळं यंदा वाहतूक कोंडी होणार नाही असं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले यांनी आज सांगितलं. मुंबई- गोवा महामार्गाच्या पाहणी दौऱ्यानंतर महाडमध्ये ते वार्ताहरांशी बोलत होते. पावसामुळे महामार्गावरचे काही स्लॅब विस्कळीत झाले असून गणेशोत्सवानंतर दुरुस्त केले जातील, महामार्गांवरच्या खड्ड्यांची तपासणी करून दोषी कंत्राटदारांवर कारवाई होईल, असं आश्वासनही त्यांनी दिलं. परशुराम घाटात सातत्याने दरड कोसळत असल्यामुळे तिथे उपाययोजना करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवल्याची माहिती भोसले यांनी दिली.

<><><><><>

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांसोबत चर्चा केल्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड - शिवराज सिंग**

येत्या ५ वर्षात महिला बचत गटांना १० लाख कोटींचे कर्ज देण्याचं आणि बचत गटातल्या महिलांना १ लाख कोटी रुपयाचं कर्ज देण्याचं उद्दिष्ट असल्याचं ते यावेळी म्हणाले.

देशात ६ कोटी लखपती दीदी बनवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यातल्या साडे ३ कोटी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित लखपती दीदींचे लक्ष्य पूर्ण करण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्या बेमुदत उपोषणाचा आज ६वा दिवस असून या आंदोलनाच्या समर्थनार्थ जालना जिल्ह्यात पुकारलेल्या बंदला ठिकठिकाणी प्रतिसाद मिळाला. बदनापूर, मंठा, जाफ्राबाद, भोकरदन, परतूर, अंबड, घनसावंगी तालुक्यासह अनेक गावांमध्ये व्यापाऱ्यांनी आपली दुकानं बंद ठेवली. हिंगोली जिल्ह्यातही ठिकठिकाणी व्यापारी पेठा बंद ठेवण्यात आल्या. वसमत तालुक्यात रास्तारोको आंदोलन करण्यात आलं, तर कुरुंदा इथून वसमत तहशील कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. तर काही ठिकाणी मराठा समाजबांधवांनी रास्तारोको आंदोलन करत प्रशासनाला निवेदन दिलं. इतर जिल्ह्यांमध्येही जरांगे यांच्या समर्थनार्थ बंद पाळण्यात आला. दरम्यान, राज्य सरकारचं एक शिष्टमंडळ आज सायंकाळी आंदोलनस्थळी मनोज जरांगे यांची भेट घेणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री सिल्व्हर कप स्पर्धेत रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या 'रेड्स ॲप' संकल्पनेला देशात तिसरा क्रमांक मिळाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या या ॲपच्या साह्याने बेवारस मृतदेह, तसंच बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यास मोठी मदत होत आहे. सध्या या ॲपचा वापर रत्नागिरी जिल्हा पोलीस दलापुरता केला जात असून, डेटाबेस तयार झाल्यास राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरच्या अनेक गुन्ह्यांची उकल करण्यासही या ॲपचा वापर प्रभावीपणे करता येऊ शकतो, अशी माहिती आज बगाटे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात पोलिस आणि वनविभागानं संयुक्त कारवाई करत सुमारे साडे ७ कोटी रुपयांची गांजाची रोपं उद्ध्वस्त केली. शिरपूर तालुक्यातल्या जागण्यापाडा आणि रोहिणी या दुर्गम भागात ही कारवाई झाली.  याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

//<><><><><>//